MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

**One Day National Interdisciplinary Conference 28 April 2023**
**Organized by Rayat Shikshan Sanstha'sProf. Dr. N.D. Patil Mahavidyalaya, Malkapur (Perid)**

Rayat Shikshan Sanstha's

# Prof. Dr. N. D. Patil Mahavidyalaya, Malkapur (Perid)

## One Day National Interdisciplinary Conference
## On
## Literary Trends and Issues in 21st Century

**Friday, 28 April 2023**

**Organized by**

**Departments of Marathi, Hindi, English, and IQAC**

**Chief Editor: - Dr. Gholap Bapu Ganpat**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Date of Publication
28th April 2023

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www.विद्यावार्ता.कॉम

YouTube Channel



*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***



Indexed

IMPACT 9.154 iijif FACTOR

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
CERTIFIED QUALITY MANAGEMENT SYSTEM
ISO 9001:2015
International Multilingual Research Journal



**http://www.printingarea.blogspot.com**

# Our Patrons

**Hon. Shri. Sharadchandra Pawar**

President, Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon. Dr. Anil Patil**

Chairman, Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon. Prin. Dr. Vitthal Shivankar**

Secretary, Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon. Prin. Dr. Shivling Menkudale**

Joint Secretary, Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon. Dr. Yashwant Thorat**

Member, Managing Council, Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon. Saroj Patil (Mai)**

Member, Managing Council, Rayat Shikshan Sanstha, Satara

## Organizing Committee

| President | IQAC Coordinator | Convener | Coordinator |
|---|---|---|---|
| Prin. Dr. T.N. Gholap | Dr. S.B.Pore | Dr. B. A. Sutar | Prof. S.K. Shaikh |

**Co-Coordinators**

Dr. S. K. Khot 8830111509 (Hindi) Prof. S.N.Chavan 9850255584 (English) Smt. Phadtare S. S

**Members**

Prof. Patil N. M. Dr.Adnaik N. S Prof. Giri C.S. Prof. Dr. Bansode S.P. Dr.Sutar R.S.
Prof. Bhandare S.A. Mr.Kamble M.D.

# INDEX

01) एकविसाव्या शतकातील मराठी नाटक
प्रा.उज्ज्वला भोर, कोपरगाव [redacted]

02) बारोमास कादंबरीतील प्रभावी स्त्रीव्यक्तीरेखा
डॉ. योगिता मारुती राघवणे, [redacted]

03) एकविसाव्या शतकातील मराठी कादंबरी 'नियोग'
डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे, [redacted]

04) एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी कविता
प्रा डा श्रीराम मारोतराव कन्हाळे, [redacted]

05) एकविसाव्या शतकातील मराठी कथा (संदर्भ: 'खुरपं' सुचिता घोरपडे)
डॉ वर्षा शिरीष फाटक, जिल्हा [redacted]

06) एकविसाव्या शतकातील आश्वासक शब्दबंध 'कोलाहलातील मौनाक्षरं'
डॉ. सतीश कामत, फोंडाघाट [redacted]

07) ग्रामीण माणसांचे अस्वस्थ वर्तमान –'सांगावा'
प्रा.डॉ.सागर अशोक पाटील, [redacted]

08) एकविसाव्या शतकातील मराठी स्त्रीलिखित कथा
डॉ. सीमा जयसिंग मुसळे, मुंबई [redacted]

09) मी रांगेतच उभा आहे : एकविसाव्या शतकातील वास्तव मांडणाऱ्या कविता
तुषार ज्ञानेश्वर पाटील, पुणे [redacted]

10) एकविसाव्या शतकातील ललितगद्य आणि हिमांशू स्मार्त यांचे ललितगद्याचे आशयविशे
श्रीराम सीताराम मोहिते, कोल्हापूर [redacted]

11) एकविसाव्या शतकातील गोमंतकीय कवयित्रींची कविता
प्रा. सोनिया मनोहर सावंत, केपे [redacted]

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

50) निर्भय विचारांच धन:जाणिवा जाग्या होताना
डा.रश्मी शेटये -तुपे, [redacted]
..............................................................................................................................

51) २१ व्या शतकातील स्त्रियांचे मराठी साहित्य लेखन
डा. उज्ज्वला यशवंत सावंत, जि. [redacted]
..............................................................................................................................

52) एकविसाव्या शतकातील आदिवासी कादंबरीकारांची मराठी कादंबरी
दत्तु रावजी मेंगाळ, जि. - सातारा [redacted]
..............................................................................................................................

53) एकविसाव्या शतकातील मराठी बालसाहित्य
मिनाक्षी स्वप्निल निंबाळकर, डा. [redacted]
..............................................................................................................................

54) तौलनिक साहित्य अभ्यासकांचा साहित्यविषयक दृष्टीकोन
बाळकृष्ण बंडू जाधव, जि. [redacted]
..............................................................................................................................

55) एकविसाव्या शतकातील मराठी अभिनेत्यांची आत्मचरित्रे
डॉ. राजेंद्र सा. बावळे, जि.[redacted]
..............................................................................................................................

56) एकविसाव्या शतकातील 'समूहकेंद्री' कथा :फिनिक्सच्या राखेतून उठला मोर — जयंत पवार
प्रा.सौ. सुनिता प्रदिप रंगारी, जि.[redacted]
..............................................................................................................................

57) एकविसाव्या शतकातील विज्ञानसाहित्याच्या प्रेरणा
श्री. प्रविणसिंह बहादुरसिंह शिलेदार, [redacted]
..............................................................................................................................

58) एकविसाव्या शतकातील मराठी आत्मकथन
भीमराव कुंडलिक जमधाडे, जि. [redacted]
..............................................................................................................................

59) जसं घडलं तसं नीलम माणगावे यांचे आत्मकथन
प्रा. डॉ. संजय चिताळकर, जि. [redacted]
..............................................................................................................................

60) २१ व्या शतकातील कांदबरीतील संकेतव्यूह ('हेही दिवस जातील' व क्वारंटाईन' ...
प्रा. डॉ. सविता अशोक [redacted]
..............................................................................................................................

61) प्रा.शंकर सखाराम यांची जागतिकीकरणाचा पडघम वाजवणारी कादंबरी ''एसईझेड''
प्रा. डॉ. प्रतिभा शंकर घाग, पुणे [redacted]
..............................................................................................................................

62) एकविसाव्या शतकातल्या कवितेतील जाणिवा
डाक्टर अनिल रुक्मिणी पाडुरंग [redacted]



www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

रचनाबंध होय.“२ तसेच मराठी अभ्यासक बापट व गोडबोले यांच्या मते, ”सत्य सृष्टीच्या आधाराने काल्पनिक पात्रांची स्वभाव चित्रे आणि काही अंशी तद्वलंबित जीवित घटना यांचे गोष्ट रूपाने वर्णन करून गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग म्हणजे ‘कादंबरी’ होय.“३

एकंदरीत वरील सर्व व्याख्यांचा विचार करीता,‘कादंबरी’ ही विशिष्ट लांबी असलेली, कथासूत्रामध्ये श्रृंखलाबध्द असलेली तसेच विषय, कथानक, व्यक्तिचित्रण,वातावरण,संवाद,भाषाशैली अशी विविध रूपे घेऊन निर्माण झालेली असते. इ.स.१८५७ साली बाबा पद्मनजी यांची ‘यमुनापर्यटन’ ही मराठीतील पहिली कादंबरी प्रसिध्द झाली आणि मराठी सहित्यात ‘कादंबरी’ पर्वास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. कादंबरी ही नंतरच्या कालखंडात विविध आशय—विषय अभिव्यक्त करत विविधांगी विकासीत होत गेलेली आहे. १९६० च्या दशकात कादंबरी हा साहित्यप्रकार विविध मराठी साहित्यप्रवाहात फुलतांना दिसतो. त्यात आदिवासी साहित्यप्रवाहही अपवाद नाही.आज सर्वच साहित्यप्रकारांबरोबर ‘कादंबरी’ हा साहित्य प्रकार आदिवासी साहित्य प्रवाहात घट्ट पाय रोवून उभा राहतांना दिसतो आहे.

**आदिवासी समाज व आदिवासी सा**[redacted]

‘आदिवासी’ या शब्दाची फोड केली तर ‘आदि’ म्हणजे ‘आरंभी’ तर ‘वास’ म्हणजे ‘वास्तव्य’ असे सूचक रूप सांगता येते. याचाच अर्थ असा की, ‘जे भूमीवर सर्वात प्रथम वास्तव्य करून आहेत त्यांनाच ‘आदिवासी’ म्हटले पाहिजे. मराठी विश्वकोशात अनुसूचित जमातींना ‘आदिवासी,मूळवासी,आदिम, आदिमजाती व टोळ्या, वन्यजाती व गिरीजन’४ अशी विविध नावे दिलेली आहेत.

‘आदिवासी’ या समाजदर्शक शब्दाची व्याख्या करतांना अनेक अभ्यासकांनी विविध व्याख्या केलेल्या आहेत.त्यापैकी पाश्चात्य मानववंशशास्त्रज्ञ ‘गिलीन आणि गिलीन’यांच्या मते, ”एका विशिष्ट भू—प्रदेशावर राहणारा, समान बोली बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेला स्थानीय गटांच्या समुच्चयाला ‘आदिवासी’ असे म्हतात.“५ तसेच आदिवासी समाजाचे अभ्यासक डॉ. गोविंद गारे यांच्या मते’ ”भौगोलिक दृष्ट्या इतरांपासून नेहमीच दूर म्हणजे गिरीकांदरात राहिल्यामुळे जंगलात राहणारा निसर्गाच्या सानिध्यात वाढलेला म्हणजे आदिवासी.“६ अशी व्याख्या केली आहे.

वरील दोनही व्याख्यामधून सर्वसाधारणपणे असे सांगता येते की,आदिवासी जमातींचे निसर्गातील डोंगर सानिध्य, वनवासीपणा, शहर व खेडी यापासूनचे जाणीवपूर्वक दुरावलेपणा, अलिप्तता दाखविले आहे. त्यांचे निसर्गाशी असलेले अद्वैत नातेच यातून स्पष्ट होते.म्हणूनच आदिवासी जमाती या निसर्गप्रेमी, आदिम व प्राचीन आहेत हेच अभ्यासांती सांगता येते.

‘आदिवासी’ या शब्दाच्या व्याख्येप्रमाणेच आदिवासी साहित्याबद्दल विविध मतमतांतरे आहेत. त्यापैकी डॉ.विनायक तुमराम यांच्या मते, ”आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे नातलग साहित्य आहे. रानावनातील वंचितांचे ते साहित्य आहे. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत अशा दुर्लक्षितांचे साहित्य आहे.ज्यांच्या आक्रोशाला इथल्या समाजव्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांती साहित्य आहे.येथल्या क्रूर कठोर न्यायव्यास्थेने ज्यांच्या शेकडो पिढ्यांना आजीवन [redacted] आहे.“७

वरील व्यख्यांचा विचार करिता आदिवसी साहित्य हे प्रस्थपित,मध्यमवर्गीय, पांढरपेशा जीवन अनुभवविश्वापेक्षा भिन्न अनुभवविश्व असणारे तसेच मध्यमवर्गीय परीघाबाहेरील जीवनविश्वाचा वेध हे आदिवासी साहित्य घेते. गावकुसाच्या बाहेरील अतिदूर,डोंगरी,दुर्गम,दऱ्याखोऱ्यात, जंगली प्राणी आणि जंगलाच्या सान्निध्यात राहणाऱ्या विविध जाती—जमातींच्या जीवन जगण्याचे विविध पदर उलगडवून दाखविते. शेकडो वर्षांच्या साहित्यपरंपरेमध्ये ज्यांचे जीवन साहित्याचा विषयच झाला नाही. अशा उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित, आदिमता प्राप्त झालेल्या विविध जाती—जमातीतील जनसमूहांच्या आक्रोशांचा शाब्दिक आविष्कार म्हणजे आदिवासी साहित्य होय.

आदिवासी कादंबरीकारांच्या मराठी कादंबरीचा

उदय :—

"ज्या कादंबरीत आदिवासी समजाचे जीवनचित्रण येते. ती कादंबरी म्हणजे आदिवासी कादंबरी." अशी सर्वसाधारण व्याख्या आदिवासी कादंबरीची करता येते. स्वातंर्त्यपूर्व कालखंडाचा विचार करिता 'मराठी कादंबरी' या साहित्यप्रकारात आदिवासी समाजाचे जीवनचित्रण काही मोजक्याच मराठी कादंबरीकारांनी केलेले आहे. तत्कालिन मार्क्सवादी, गांधीवादी आणि सर्वोदयवादी विचारसरणीच्या प्रेरणेतून मराठी कादंबरीत आदिवासी समाजाचे जीवनचित्रण आलेले आहे. महाराष्ट्रात एकूण सत्तेचाळीस आदिवासी समाजगटांचा समावेश अनु. जमाती या संवर्गात केला जातो. त्यापैकी काही ठराविकच समाजगटांचे जीवनचित्रण हे मराठी कादंबरीत आलेले आहे. 'भिल्ल, कातकरी, ठाकर, वारली, माडिया—गोंड, राजगोंड, मुंडा, महादेव कोळी आणि कोरकू' अशा काही मोजक्याच आदिवासी जमातींचे जीवनचित्रण आदिवासीतर कादंबरीकारांनी मराठी कादंबरीत केलेले आहे. आणि जे वर्णन आलेले आहे ते कमी प्रमाणात दिसते. त्याचप्रमाणे हे वर्णन मुख्य कथानकाला रंजकता येण्यासाठी आलेले आहेअसे आपणास दिसते.

मराठी कादंबरीचा विचार करिता कुसुमावती देशपांडे यांच्या मते, "मराठी साहित्यात आदिम जमातीकडे र. वा. दिघे यांनी प्रथम लक्ष वेधले."८ कुसुमावती देशपांडे यांच्या मताचा विचार करिता मराठी कादंबरीकार र. वा. दिघे यांनी खऱ्या अर्थाने आदिवासी समाजाला 'कादंबरी' या साहित्यप्रकारात मानाचे स्थान मिळवून दिलेले आहे.

मराठी कादंबरीकार र. वा. दिघे यांच्या 'पाणकळा'(१९३९) या कादंबरीत मुख्य कथानकाला रंजकता प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी आदिवासी समाजाचे जीवनचित्रण करण्यासाठी आदिवासी सामाज्याचे नेतृत्व करणारी व्यक्तिरेखा या कादंबरीत साकार केलेली आहे. 'पाणकळा' या कादंबरीत मराठी कादंबरीकार र. वा. दिघे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील 'भिल्ल' या आदिवासी समाजाचे जीवनचित्रण केले आहे. यानंतरच्या कालखंडात अनेक आदिवासीतर कादंबरीकारांनी आदिवासी समाजवास्तव मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु या कादंबरीकारांना हा अनुभव प्रत्यक्ष आलेला नसल्यामुळे ते वास्तवदर्शी झालेले दिसत नाही.

इ.स. १९६० नंतर मराठी साहित्यात विविध साहित्य प्रवाह निर्माण झाले. त्यामुळे मराठी कादंबरीच्याही कक्षा रुंदावल्या गेल्या. आदिवसी साहित्यप्रवाह कालखंडात आदिवासी नवशिक्षित तरुण साहित्यिक विविध साहित्यप्रकारांत लेखन करू लागले त्यामुळे इ.स.१९७०—८० च्या दशकात आदिवसी साहित्य नावारूपाला आलेले दिसते. त्यातल्यात्यात इ.स. १९९० च्या नंतरच्या दशकात आदिवासी कादंबरीकरांनी मराठी कादंबरी या साहित्यप्रकारात लेखन करण्यास प्रारंभ केलेला आहे. या कादंबरीकारांचा जन्मच आदिवासी समजातील असल्यामुळे त्यांना आपल्या समाज्याची पुरेपूर जान आहे. तसेच ते विविध समाजसेवी चळवळीच्या निमित्ताने किंवा नोकरीच्या निमित्ताने ग्रामीण व शहरी जीवनाशी त्यांचा संबंध आल्यानंतर त्यांना जे बरेवाईट अनुभव आले ते वास्तवदर्शी अनुभव कादंबरीच्या रूपाने आदिवासी कादंबरीकार मांडू लागलेले आहेत. आदिवासी समाजातील कादंबरीकारांचा विचार केला तर मराठी कादंबरी या साहित्यप्रकारात आदिवासी समाजातील स्त्री लेखिका नजूबाई गावित यांचे नाव प्रथमता येते.त्यांच्या 'तृष्णा'या कादंबरीचा भाग—१ 'आदोर' इ. स. १९९५ मध्ये प्रकाशित झाला आणि आदिवासी समाजातील मराठी कादंबरीची मुहूर्तमेढ रोवली गेली. 'तृष्णा' ही त्यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. त्याचप्रमाणे त्यांची दुसरी कादंबरी 'भिवा फरारी' (२००८) प्रकाशित झाली आहे.

'आंध' या आदिवासी समाजातील कादंबरीकार माधव सरकुंडे हे आदिवासी समाजातील दुसरे कादंबरीकार आहेत. त्यांची 'वाडा'(१९९६) ही कादंबरी 'आंध' या आदिवासी समाजाचे जीवनचित्रण रेखाटत आहे. त्यानंतर आदिवसी समाजातील कादंबरीकार बाबाराव मडावी यांची 'टाहो'(१९९८) ही कादंबरी प्रकाशित झाली. नंतरच्या कालखंडात आदिवसी समाजातील कादंबरीकार तुकाराम चौधरी यांची 'पाड्यवरचा टिल्या' (२०१८) प्रकाशित झाली आहे. तसेच आदिवासी समजातील साहित्य क्षेत्रातील आघाडीचे कवी व समीक्षक

डॉ. विनोद कुमरे यांची 'कोयतूर'(२०२०) ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. आदिवसी समजातील उच्चशिक्षित व मराठी कादंबरी या साहित्यप्रकारात आपला ठसा उमटवणारे कादंबरीकार डॉ.कृष्णा भवारी हे आहेत.त्यांची 'इधोस'(२०२०)ही कादंबरी आजच्या वास्तव काळातील आदिवासी समाजाचे जीवनचित्रण रेखाटणारी कादंबरीचा उत्कृष्ट नमुनाच वाचकांस उपलब्ध आहे.

एकविसाव्या शतकातील आदिवासी समजातील कादंबरीकारांच्या मराठी कादंबरीविषयी पुढीलप्रमाणे चर्चा करता येईल.

### भिवा फरारी:—

'भिवा फरारी' ही कादंबरी आदिवासी समाजातील पहिलीस्त्री लेखिका नजूबाई गावित यांची ही ऐतिहासिक कादंबरी आहे. ही कादंबरी 'शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर' यांनी इ.स. २००८ मध्ये प्रकाशित केली आहे. लेखिकानजुबाई गावित यांची 'भिवा फरारी' ही आदिवासींच्या उपेक्षित इतिहासातील सुवर्णपान आहे. या कादंबरीत लेखिकेने इंग्रजांशी संघर्ष करत आपल्या समाजातील लोकांना जागवण्यासाठी व जगवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या ध्येयवादी भिवाची कहाणी सांगितली आहे. ही कहाणी काल्पनिक असली तरी तिला वास्तवाचा आधार दिलेला आहे.

आदिवासी समाज्याच्या जीवनपद्धतींचा आणि जीवनसंघर्षाचा जिवंत आलेख लेखिका नजूबाई गावित यांनी 'भिवा फरारी' कादंबरीत मांडला आहे.आदिवासी सामाज्यांनी परकीय सत्तेशी केलेला संघर्ष, लढाया आणिउठावहे भारतीय इतिहासात उपेक्षितच राहिले आहेत. इंग्रज सत्तेच्या जुलमी, जाचक,शोषक व्यवस्थेविरुद्ध भिवाच्या तीन पिढ्यांनी त्यांचे स्वातंत्र्य, स्वाभिमान, अस्तित्त्व आणिअस्मिताशाबूत ठेवण्यासाठी दिलेली झुंज हे या कादंबरीचे प्रमुख सूत्र आहे.

'भिल्ल' या आदिवासी समाजातील 'भिवा' हा आपल्या कर्तृत्त्वाने माणुसकी कायम राखण्यासाठी सातत्याने समता—संघर्षाची एक अनोखी चळवळ उभारतांना दिसतो.तो सतत अन्यायाच्या गर्तेत सापडलेल्यांना समतेची वागणूक देत त्यांना माणुसकीने जगण्यासाठी सांगत असतो. त्याचप्रमाणे वर्षानुवर्षे आदिवासी समजात रूढ असलेल्या अंधश्रद्धांचा स्त्रियांच्या जीवनावर कसा परिणाम होतो त्याचेही दर्शन लेखिका नजूबाई गावित यांनी या कादंबरीत चित्रित केले आहे.

लेखिका नजुबाई गावित यांच्या 'भिवा फरारी' या कादंबरीत निसर्गाशी एकरूपता,प्राणीप्रेम,समूहनिष्ठा, सहकार्याची भावना,धर्मनिरपेक्षता,स्वातंत्र्य, समता,बंधुता, अल्पसंतुष्टवृत्ती, माणुसकीही मानवी मूल्ये लेखिका नजुबाई गावित यांच्या या कादंबरीत रुजलेली दिसतात. त्यामुळे'भिवा फरारी' ही कादंबरी मराठी आदिवासी साहित्य प्रवाहात सरस आतेरलेली आहे.

आदिवासी समजातील नवकादंबरीकार तुकाराम चौधरी यांची 'पाड्यावरचा टिल्या' ही कादंबरी 'मेधा प्रकाशन, अमरावती' या प्रकाशनाने इ.स. २०१८ मध्ये प्रकाशित केली आहे. या कादंबरीत लेखक तुकाराम चौधरी यांनी प्रागैतिहासिक पद्धतीने शेती करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्याची व्यथा सादर केली आहे.तसेच या कादंबरीत त्यांनी आदिवसी समाज्यातील मुलांचे शिक्षण केंद्रित ठेवून एकूण आदिवासी जीवनपद्धतीचा परामर्श घेतलेला आहे.

कादंबरीकार तुकाराम चौधरी यांनी 'पाड्यावरच्या टिल्या' या कादंबरीत टिल्यासारखी अनेकआदिवासी समजतील मुले, मुलीजगण्यासाठी पारंपारिक अनुभव, संकट आणि साहसांना निर्भयपणे सामोरे जातांना या कादंबरीत दिसतात. आदिवासींच्या दैनंदिनीचे विवरण लेखक या कादंबरीत करतांना दिसतात.

घरात अन्नाचा कण नसतांनाही पवसाळ्यात उगवणाऱ्या रानभाज्या, कंदमुळे, रानवनस्पतींचे औषदीउपयोग,पक्षी,खेकडे अन प्राण्यांची शिकार करून आपली उपजिविका करतात. असे असले तरीही विणीच्या काळात मासे,खेकाडे न पकडणे, लहान प्राणी अथवा पक्षी न मारणे हीनिसर्गाकडून आलेली 'वैश्विक नैतिकता' तेपाळतांना दिसतात. ही मानवी सभ्यता आदिवासी समाज्यात पाहवयास मिळते.

'पाड्यवरचा टिल्या' या कादंबरीबद्दल आदिवासी साहित्यिक व अभ्यासक डॉ. संजय लोहकरे म्हणतात की,"याकादंबरीची संहिता, विविध घटना,

प्रसंग,पात्र, वातावरण व अवकाशाने समृध्द आहे. ही कादंबरी म्हणजे एका सर्जनशील लेखकाचं आत्मकथन आहे.म्हणून ही आत्मवृत्तपर कादंबरी आहे. निसर्गाशी, समाजजीवनाशी आणि आपल्या बोलीशी संवादी नाते निर्माण केले आहे.या कलाकृतीने आदिवासी साहित्याची चळवळ अधिक समृद्ध व्हावी ही अपेक्षा." अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. आणि ही अपेक्षा ही कादंबरी पूर्ण करतांना दिसते.

**कोयतूर:—**

आदिवासी साहित्यप्रवाहातील आघाडीचे कवी व समीक्षक डॉ. विनोद कुमरे यांची 'कोयतूर' ही कादंबरी 'शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर' यांनी इ.स. २०२० मध्ये प्रकाशित केली आहे.'कोयतूर' ही एका आदिवासी समाजातील लेखकाने लिहिलेली पहिली गोंडी कादंबरी आहे. आदिवासी विकासाची नवी परिभाषा मांडत आदिवासी विकासाची कल्पना व त्याभोवती फिरणारे सर्व स्तरावरील राजकरण अभिव्यक्त करणारी ही कादंबरी आहे.

'कोयतूर' या कादंबरीत कादंबरीकार डॉ. विनोद कुमरे यांनी आदिवासी गोंड समाजाचे जीवनचित्रण रेखाटले आहे. ही कादंबरी आदिवासी जीवनरुपाला, त्यांच्या समस्याग्रस्तेला, प्रश्नोप्रश्नांना व अभ्युदयामार्गांना सुस्पष्ट करणारी अशी महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. विदर्भाच्या भौगोलिक परिसरातील 'गोंड' या आदिवसी समाजावर केंद्रिभूत असलेली ही कादंबरी समस्त आदिवसी समाज्याच्या जीवनसंघर्षाला व त्यांच्या शोषित—वंचिततेला अधोरेखित करतांना दिसते. अनेक शतकापासून उपेक्षित व वंचित गोंड आदिवासींच्या जीवनरुपांना, जीवनसमस्यांना हि कादंबरी कधी चर्चात्मक तर कधी चिंतनात्मक पद्धतीने हात घालतांना दिसेत. आणि त्या समस्यांच्या निराकरणाचे मार्गदर्शन करणारे मार्ग अधिक सुस्पष्ट करतांना दिसते.

आदिवासी समाजातील कादंबरीकार डॉ. विनोद कुमरे यांच्या लेखणीतून प्रथमताच इतक्या कलात्मक, प्रत्ययकारी व प्रभावी पद्धतीने मांडले गेले आहे. त्यामुळे या कादंबरीचे वेगळेपण आपल्या सहजपणे लक्षात येते.

**इधोस:—**

आदिवासी समजातील तरुण कादंबरीकार डॉ. कृष्णा भवारी यांची 'इधोस' ही कादंबरी 'कुणाल मदन हजेरी, चेतक बुक्स पुणे.' यांनी इ.स.२०२० मध्ये प्रकाशित केली आहे.आदिवासी जीवनावर भाष्य करणारी ही वास्तवदर्शी कादंबरी आहे.

'इधोस' या कादंबरीमधील आदिवासींचा जीवनसंघर्ष, त्यांची संस्कृती, पात्रांच्या तोंडची अस्सल आदिवासी सामाज्याची बोली,एखाद्या चित्रपटाप्रमाणे [redacted] कथानकाला साजेशी पात्ररचना, मिश्कील विनोद आणि जल्जंगल—जमीन यांच्याशी जडलेली आदिवासींची अतूट नाळ' या सर्व गुण वैशिष्ट्यमुळे या कादंबरीला राज्यस्तरीय तीन पुरस्कारही मिळालेले आहेत. 'इधोस' ही कादंबरी म्हणजे आदिवासी संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे.असे या कादंबरीविषयी सांगता येइल.

अशाप्रकारे आदिवासी समाजातील कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीतून आदिवासी समजातील वास्तव जीवन—जाणीवा विविध मराठी कादंबरीच्या कथासूत्रातून गुंफलेल्या आहेत.

**निष्कर्ष:—**

१) आदिवासीतर कादंबरीकारांच्या कादंबरीपेक्षा आदिवासी समाजातील कादंबरीकारांची मराठी कादंबरी ही अदिवासी जीवनाशी अगदी जवळ जाणारी वास्तवदर्शी कादंबरी आहे.

२) आदिवासी कादंबरीकारांनी मराठी कादंबरीत आदिवासी बोली भाषेचा चपखलपणे उपयोग केलेला आहे. त्यामुळे कादंबरीत जिवंतपणा व नैसर्गिकता आली आहे.

३) आदिवासी कादंबरीकार हे आदिवासी समाजाचे प्रत्यक्ष एक घटक आहेत .त्यामुळे त्यांनी जे प्रत्यक्ष पाहिले, भोगले, अनुभवले त्याचे तपशीलवार चित्रण कादंबरीत त्यांनी मांडले आहे.

४) आदिवासी समाजातील कादंबरीकारांनी आपल्या समाज्यातील व्यक्तिरेखांना नायकत्त्व दिलेले आहे. हा नायक आपल्या समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात लढतांना दिसतो.समाजात सुधारण्यासाठी प्रयत्न करतांना दिसतो.

[redacted]

कादंबरीकार सतत आपल्या लेखणीतून सांगतांना दिसतो आहे. त्यासाठी कादंबरीतील नायक हा विविध चळवळीत कार्येतत्पर आहे.

६) आदिवासी कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीतून आपल्या समाजातील नीतीमूल्ये, चालीरीती, प्रथा, संस्कृतीचे वेगळेपण,सण—उत्सव आणि बोलीभाषेची गुणवैशिष्टे जतन केली आहेत.

७) आदिवासी कादंबरीकारांची कादंबरी ही समाजात नवमूल्ये रुजवण्याचा सतत प्रयत्न करतांना दिसते.

८) आदिवासी कादंबरीकारांनी ज्या आदिवासी समाजाचे जीवनचित्रण कादंबरीत केले आहे. त्या समाजाची आर्थिक, सामजिक, राजकीय व सांस्कृतिक वास्तव परिस्थिती उलगडवून दाखवली आहे.

९) आदिवासी समाजातील कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीत प्रस्थपित, मध्यमवर्गीय, पांढरपेशा जीवन अनुभवविश्वापेक्षा भिन्न अनुभवविश्व तसेच मध्यमवर्गीय परीघाबाहेरील जीवनविश्वाचा वेध घेतला आहे.

१०) आदिवासी समाजातील कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीत गावकुसाच्या बाहेरील अतिदूर, डोंगरी, दुर्गम, दऱ्याखोऱ्यात, जंगली प्राणी आणि जंगलाच्या सान्निध्यात राहणाऱ्या विविध जाती—जमातींच्या जीवन जगण्याचे विविध पदर उलगडवून दाखविले आहे.

११) शेकडो वर्षाच्या साहित्यपरंपरेमध्ये ज्यांचे जीवन साहित्याचा विषयच झाला नाही. अशा उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित, आदिमता प्राप्त झालेल्या विविध जाती—जमातीतील जनसमूहांच्या आक्रोशांचा शाब्दिक आविष्कार आदिवासी समाजातील कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीत केला आहे.

संदर्भ ग्रंथ :—

१) क्रमवंत जगन्नाथशास्त्री, 'महाराष्ट्र भाषेचा कोश (१९२६), बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचा छापखाना मुंबई.प्र.आ.१९२६.

२) गणोरकर प्रभा, धाके वसंत, दडकर जया, भटकळ सदानंद, राजवाडे आशा, वरखेडे रमेश(संपादित), 'वाङ्मयीन संज्ञा—संकल्पना कोश', जी.आर. भटकळ फाऊन्डेशन, मुंबई., प्र.आ. २००१, पृ.क्र.१०७.

३) बापट, गोडबोले , 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास',व्हीजन प्रकाशनपुणे. ति.आ.१९७३, पृ.क्र.३७.

४) जोशी लक्ष्मणशास्त्री , "मराठी विश्वकोश खंड पहिला, म. रा .सा. संस्कृती कोश मंडळ मुंबई, प्र.आ. १९७६,पृ.क्र.२४२.

५) तुकाराम विनायक, 'आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा' विजय प्रकाशन नागपूर, प्र.आ.१९९७, पृ.क्र.७.

६) गारे गोविंद, 'भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती', अमृत प्रकाशन औरंगाबाद,प्र.आ.१९९३,पृ.क्र.८७.

७) लिंबाळे शरणकुमार (संपा.), 'मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह', मधुराज प्रकाशन प्रा.लि.पुणे, प्र.आ.१९९३,पृ.क्र. १५१.

८) देशपांडे कुसुमावती, 'मराठी कादंबरी पहिले शतक (१८५० ते १९५०),मुंबई मराठी साहित्य संघ मुंबई., दु. आ.१९७५,पृ.क्र. ३२०.

९) गावित नजूबाई , 'भिवा फरारी ', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्र.आ.२००८.

१०) चौधरी तुकाराम, 'पाड्यावरचा टिल्या', मेधा पब्लिशिंग हाऊस अमरावती, प्र.आ. २०१८.

११) कुमरे विनोद, 'कोयतूर', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्र.आ.२०२०.

१२) कृष्णा भवारी यांची 'इधोस' ही कादंबरी 'कुणाल मदन हजेरी, चेतक बुक्स पुणे. प्र.आ.२०२०.

**संदर्भसुची**

१. संपा. डॉ. मंदा खांडगे, डॉ. निलिमा गुंडी, डॉ. विद्या देवधर, डॉ. निशिकांत मिरजकर : भारतीय भाषांतील स्त्री साहित्याचा मागोवा: खंड २, डायमंड पब्लिकेशन, पुणे, (प. आ.), डिसें २००७.

२. संपा. पुष्पलता राजापुरे—तापस : १९८०नंतरचे स्त्रीनिर्मीत कथनपर साहित्य, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर, [redacted]

३. संपा. मेधा नानीवडेकर : महाराष्ट्रातील स्त्रीचळवळीचा मागोवा (१९७५ पासून), प्रतिमा प्रकाशन, पुणे, (प. आ.), जानेवारी २००६.

४. वंदना भागवत : स्त्रीवाद, साहित्य आणि समिक्षा, डायमंड पब्लिकेश, पुणे, (प. आ.), डिसेंबर २०१८

५. संपा. डॉ. दादा गोरे : अक्षरयात्रा २०२०—२१ — एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे लेखन, गोदा प्रकाशन, औरंगाबाद.